**WHOLE LIFE IS A YOGA**

Man is at once a physical embodiment, mental phenomenon and spiritual entity. Besides physical and vital needs, he has to focus more on controlling chitt vritti, moral consciousness and spiritual aspirations. Brahmavidya shows the goal and Yoga shastra shows the way.

1) Jnana Yoga- Philosophical technique of rational and scientific thinking and analysis

2) Raja Yoga or psychic mystical way of analysing mind stuff

3) Bhakti Yoga- way of spiritual love and devotion

4) Karma Yoga- science and art of spiritual activity

5) Hath Yoga- Disciplining physical body, nervous system and vital forces for inner discipline and meditation

5) Kundalini Yoga- Bringing into activity dominant and latent occult force so that one becomes conscious of one's true nature

7) Mantra- Yantra-Tantra- Yoga- Mystic process of generating spiritual force and vibration within.

8) Japa Yoga- Spiritual practice of chanting divine names  to bring harmony and illumination in inner nature of man

9) Laya Yoga or dissolution of mind into spirit- effects into causes, gross to subtle raising one's consciousness from lower to higher.



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत–

१) ‘दिव्य जीवन’ या मासिक पत्रिकेचा अंक परिवारातील सदस्यांना (हार्ड आणि सॉफ्ट स्वरूपात) वितरित करण्यात आला.

२) एकोणिसावी राज्यस्तरीय आंतर शालेय निबंध स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. ४५० हून अधिक विद्यार्थ्यांनी यंदा सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचा निकाल सर्व सहभागी शाळांना कळविण्यात आला तसेच विद्यार्थ्यांची सर्टिफिकेट्स पाठविण्यात आली. विजयी विद्यार्थ्यांना पारितोषिकाची रक्कम मनीऑर्डरने पाठविण्यात आली.

३) या महिन्यात २७ सप्टेंबरला राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

### पुणे शाखेचा पत्ता


**श्री.नितीन देशपांडे**

‘ईशावास्य’ प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के. विश्व, धायरी, पुणे ४११०६८,

मो.नं. ९८५०९३१४१७


बुक पोस्ट

प्रति,




# दिव्य जीवन




पुणे शाखा

वर्ष २१ / अंक ९

सप्टेंबर २०२५

Mantras can remove every kind of trouble, cure diseases, heal enmities, remedy failures, and even put an end to storms and draughts.

**Swami Sivananda**

The feet of the Guru are the source of Light, Peace, Power and Joy.

**Swami Chidananda**

<u>महिन्याचा विचार :</u>

योग सराव विशेषतः ध्यानातून योग साधकाला उच्च दर्जाची शक्ती बहाल करतो. विचार हस्तांतरण ( टेलीपथी ), विचार–वाचन , अतींद्रिय दृष्टी अशा प्रक्रिया त्यांच्यासाठी सामान्य बनून जातात. आपण काही चमत्कार करतोय याची गुरुदेवांना जाणीवही नसे. त्यांच्या भेटीत आपलं अंतर्गत व्यक्तित्व त्यांच्या आहारी जात असे, जसा हा कागद तुमच्या नजरेसमोर स्पष्ट दिसतोय तसा. त्यांनी काही विशेष क्रिया करण्याची गरज भासत नसे. समोरच्याचे मन, हृदय एखाद्या खुल्या पुस्तकाप्रमाणे त्यांच्यासमोर उघडत असे. तुमच्या मनातील विचार त्यांच्या मनातही उमटत असे. तुमची इच्छा त्यांना आपोआप समजत असे, जणू ती त्यांना ऐकू येत असे. कदाचित हा सुखद योगायोग असेल. ‘ माझ्याही मनात असेच आले ‘ असे ते सहजगत्या म्हणून जात किंवा तुमच्या मनात आलेल्या प्रार्थनेनुसार ते कृती करीत आणि म्हणत– ‘ तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, त्याच्यासाठी हे नैसर्गिक आहे. ‘

परदेशातील शिष्य अशाचप्रकारचे त्यांचे अनुभव कथन करीत. गुरुदेव त्यांना दिसत, त्यांचा आवाज ऐकू येत असे. हे सगळं सत्य आहे. गुरुदेव असतील तिथे एकाचवेळी अनेक भक्तांचा विचार करीत असत –त्यांना पुस्तके पाठविण्याचा, त्यांच्या पत्रांना उत्तरे देण्याचा. त्यांचे मन अतींद्रिय



होते आणि त्यांना आश्चर्यकारक दैवी अशा देणग्या प्राप्त होत्या. त्यामुळे गुरुदेवांमध्ये आणि शिष्यात विचारांचा संपर्क क्षणार्धात होत असे. या माध्यमातून गुरुदेवांच्या चैतन्याचा प्रवाह अतिशय वेगाने शिष्यापर्यंत पोहोचत असे आणि त्यांच्या गरजा समजून घेतल्यावर त्वरित त्यांचे निराकरण होत असे. एक प्रकारची ही ‘ प्रतिक्षिप्त क्रिया ‘ असे. सगळं आपोआप घडत असे.

**गुरुदेवांची अलौकिक बुद्धिमत्ता** : या शारीरिक देणग्यांव्यतिरिक्त या योग्याकडे मनाच्या आणि बुद्धीच्या काही अलौकिक शक्ती होत्या. मनाचा कणखर ताबाच त्यांना अध्यात्मिक साहित्याचा साठा विश्वाला देण्यास सहाय्यीभूत झाला.

तीनशेहून अधिक पुस्तके त्यांच्या हातून लिहून झाली. एका महत्वाच्या संस्थेचे ते प्रमुख होते, त्या संस्थेच्या जगभर शाखा आहेत, दुसरीकडे ते आश्रमही सांभाळत असत ज्यामध्ये २०० हून अधिक साधक कायमचे वास्तव्याला होते आणि अभ्यागत तितक्याच संख्येने येत असत. आश्रमात एखादा आठवडा मुक्काम केला असेल तर तुम्हाला आश्रम व्यवस्थापनाचे धडे समजले असतील. प्रत्येक साधकावर त्यांचे व्यक्तिगत लक्ष असे, कारण त्या साधकाने स्वतःचे आयुष्य गुरुदेवांना अर्पण केलेले असे. एखादा आजारी असेल तर गुरुदेव स्वतः त्याला भेटायला जात, जवळपासच्यांना त्याची शुश्रूषा करण्यास सांगत, दूध आणि फळे त्या आजारी साधकाकडे पोहोचती



होताहेत की नाही यावर त्यांचा कटाक्ष असे. व्यवस्थित वैद्यकीय उपचार केले जाताहेत की नाही यावर करडी नजर ठेवत. आणि अशाप्रकारे गुरुदेवांच्या चरणकमलांकडे आकृष्ट झालेल्या प्रत्येक निःस्वार्थी साधकाची काळजी घेतली जात असे. अभ्यागत त्यांच्या दृष्टीने परमेश्वर असे आणि त्यामुळे त्याच्याकडे विशेष लक्ष दिले जात असे, त्याला घरच्यापेक्षाही अधिक आराम मिळावा असे प्रयत्न केले जात असत. या वाढत्या संस्थेपुढे मग आर्थिक अडचणी समोर उभ्या ठाकत. इथला प्रत्येक साधक कर्ज निर्माण करायला मोकळा होता आणि परिस्थिती हाताबाहेर गेल्यावर गुरुदेव साहाय्याला आल्याशिवाय ते प्रश्न सुटत नसत. साधारण दर तीन महिन्यांनी असे होत असे. क्वचित प्रसंगी दोन साधकांमधील विवादाचा निवाडा त्यांनाच करावा लागत असे. अशावेळी ते दोघांचीही बाजू घेत, त्यांच्यातील चांगल्या गोष्टी नजरेस आणून देत आणि स्मितहास्य करीत समारोप करीत. काही मिनिटांमध्ये गुरुदेव दोघांमधील दुरावा नष्ट करीत आणि चहाच्या कपाबरोबर त्यांच्यातील वैरभाव मावळत असे. कार्यालयातील रजिस्टरमध्ये किमान दहा हजार साधकांचे पत्ते होते, जे आश्रमाशी सातत्याने संपर्कात असत. गुरुदेव त्यांच्याशी स्वतः पत्रव्यवहारातून आणि मोफत पुस्तके वाटपातून संपर्कात असत. (क्रमशः )